क्र.मह-१/आस्था/सीआर/ ६०३ /२०१६
आयुक्त पुणे विभाग,पुणे यांचे कार्यालय
विधान भवन,पुणे -४११००१
दिनांक -३०/११/२०१६

# अधिसूचना

शासन,महसूल व वन विभाग,मंत्रालय,मुंबई - ३२ यांचेकडील शासन निर्णय क्र.ईएसटी - २०१३/प्र.क्र.१७३/ ई -८,दिनांक -१४/११/२०१३ अन्वये विभागीय आयुक्त कार्यालयासाठी १ विधी अधिकारी यांची ११ महिन्याच्या कंत्राटी तत्वावर शासनादवारे विहीत केलेल्या अटी व शर्तीनुसार किंवा सेवा प्रवेश नियमानुसार नियुक्ती देणेबाबत मान्यता दिलेली आहे.सदर विधी अधिकारी यांना एकत्रित मासिक **मानधन र.रू.२०,०००/-(अक्षरी र.रूपये वीस हजार मात्र )** + **दूरध्वनी व प्रवास खर्च र.रू.५,०००/- (अक्षरी र.रू पाच हजार मात्र )** इतक्या रकमेवर कंत्राटी पध्दतीने भरणार असून ते शासकीय कर्मचारी म्हणून गणले जाणार नाहीत.

शैक्षणिक अर्हता व अनुभव :-

१) उमेदवार मान्यताप्राप्त विद्यापीठाचा कायद्याचा पदवीधर असेल.तो सनदधारक असेल.

२) विधी अधिकारी या पदासाठी वकिली व्यवसायाचा किमान ७ वर्षाचा अनुभव आवश्यक राहील.

३) उमेदवारास महसूल विषयक,सेवाविषयक ,प्रशासकीय अशा सर्व प्रकारच्या कायद्याची स्थिती तथा विभागीय चौकशा इ.बाबत ज्ञान संपन्न असेल.ज्यामुळे कायदेविषयक कार्यवाही ती कार्यक्षमतेने पार पाडू शकेल.

४) उमेदवारास मराठी ,हिंदी व इंग्रजी या भाषेचे पुरेसे ज्ञान असेल.

५) विधी अधिकारी या पदासाठी उमेदवाराचे वय नियुक्तीवेळी ४५ वर्षापेक्षा जास्त नसेल.

सदर अर्जाचा नमुना,अटी,कर्तव्य व जबाबदा-या व इतर बाबतची माहिती **आयुक्त, पुणे विभाग,पुणे (महसूल शाखा)पुणे-१ येथे,तसेच आयुक्त कार्यालयाचे संकेत स्थळ hfttp://www.divcompune.in** यावर उपलब्ध होऊ शकेल.

**विधी अधिकारी यांची निवड:-**

विधी अधिकारी यांची निवड विभागीय आयुक्त यांच्या अध्यक्षतेखालील जिल्हा निवड समितीच्या अखत्यारीत राहील.तसेच संबंधित विभागीय आयुक्त हे नियुक्ती प्राधिकारी असतील.

पात्र असलेल्या उमेदवारांकडून विहीत नमुन्यात दोन प्रतीत अर्ज मागविणेत येत असून कार्यालयीन वेळेत (सुट्टीचे दिवस सोडून ) अर्ज विभागीय आयुक्त,पुणे यांचे कार्यालयात दिनांक - १७/१२/२०१६ पावेतो पोचतील अशा बेताने सादर करावे.त्यानंतर येणा-या अर्जाचा विचार केला जाणार नाही.

**(एस्.चोक्कलिंगम्)**
**आयुक्त,पुणे विभाग,पुणे**